**ठळक बातम्या**

- भाजपा सत्तेत असेपर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० पुनर्स्थापित केलं जाणार नाही अशी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची ग्वाही

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी मुंबईत दाखल

- अबुधाबीचे युवराज अल नाहयान यांची उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी बैठक

- टाइम मासिकाच्या तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या सर्वात प्रभावी व्यक्तींमध्ये केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचा समावेश

- अमेरिकी खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत बेलारूसच्या अरीना सबालेंका अजिंक्य

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेचा आज समारोप, २९ पदकांसह भारतानं नोंदवली आत्तापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी.

**<><><><><>**

भाजपा सत्तेत आहे तोपर्यंत जम्मू काश्मीरमधलं ३७० कलम पुनर्स्थापित केलं जाणार नाही, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. रामबान जिल्ह्यात ते आज प्रचारसभेला संबोधित करत

होते. केंद्रशासीत प्रदेशात आहे तीच स्थिती कायम ठेवण्याच्या भाजपाच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला, तसंच जम्मू काश्मीर मध्ये होत असलेल्या प्रगतीवर लक्ष केंद्रित केल्याचं सांगितलं. जम्मू काश्मीरमधल्या निवडणुकांकडे जगाचं लक्ष लागल्याचंही ते म्हणाले. ३७० कलम काढून टाकल्यानंतर मतदानाची टक्केवारी वाढल्याचंही राजनाथ सिंह यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आज आगमन झालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर अमित शहा यांनी मुंबई समाचार या वृत्तपत्राच्या द्विशताब्दीनिमित्त तयार केलेल्या लघुपटाचं अनावरण केलं. १८२२ मधे मुंबईत सुरु झालेलं हे गुजराती वर्तमानपत्र आशिया खंडातल्या सर्वात जुन्या वर्तमानपत्रांपैकी एक आहे.

गृहमंत्री शाह उद्या दिवसभर मुंबईतल्या विविध भागातल्या गणेश मंडळांना भेट देणार आहेत.

**<><><><><>**

अबूधाबीचे युवराज शेख खालेद बिन मोहमद बिन झायेद अल नाहयान यांचं तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी आज संध्याकाळी नवी दिल्लीत आगमन झालं. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. युवराज नाहयान यांच्यासोबत संयुक्त

अरब अमिरातीचे अनेक मंत्री आणि उद्योगजगतातलं प्रतिनिधीमंडळ आहे. युवराज नाहयान उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असून द्विपक्षीय संबंधांवर ते चर्चा करतील. तसंच ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची ते भेट घेतील आणि राजघाट इथं जाऊन महात्मा गांधींना आदरांजली वाहतील. मंगळवारी युवराज नाहयान मुंबईत एका व्यापार मंचाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आज तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात सौदी अरेबियाच्या भेटीसाठी रियाद इथं पोहोचले. या भेटीत ते रियाध इथं होत असलेल्या पहिल्या भारत-आखात सहकार्य संघटनेच्या - जीसीसीच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. पश्चिम आशियातले ६ देश या संघटनेचे सदस्य आहेत. याशिवाय या दोन दिवसांच्या भेटीत ते जीसीसीच्या सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांसमवेत द्विपक्षीय बैठका घेण्याचीही शक्यता आहे.

येत्या मंगळवारी ते आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात दोन दिवसांच्या जर्मनी भेटीसाठी रवाना होतील. जर्मनीचा दौरा आटोपून १२ सप्टेंबरला ते स्वित्झर्लंड भेटीसाठी रवाना होतील. स्वित्झर्लंडमध्ये ते जीनिव्हा इथं स्वित्झर्लंडचे परराष्ट्र मंत्री तसंच, भारताचा सक्रीय सहभाग असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रमुख आणि प्रतिनिधींची भेट घेणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, आपण विविध देशात कशारितीने गणेशोत्सव साजरा केला जातो हे आपण जाणून घेत आहोत. आज आपण श्रीलंकेत कोलंबो मधल्या सार्वजनिक गणेशोत्सवाची माहिती जाणून घेणार आहोत. कोलंबोमध्ये राहणाऱ्या मीनल रेणाविकर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं...

**होल्ड - मीनल श्रीलंका**

**<><><><><>**

टाइम या जगप्रसिद्ध नियतकालिकानं तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या सर्वांत प्रभावी व्यक्तींमध्ये केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांना स्थान दिलं आहे. यासंदर्भात टाईमनं प्रकाशित केलेल्या यादीत वैष्णव यांच्या नावाचा शेपर्स या गटात समावेश केला आहे. वैष्णव यांच्या नेतृत्वात येत्या पाच वर्षांत भारत सेमीकंडक्टरच्या उत्पादनात जगातल्या पहिल्या पाच देशांमध्ये येईल, अशी आशा असल्याचंही टाइमनं म्हटलं आहे. वैष्णव यांच्या नावाचा या यादीत समावेश झाल्यानं, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जगात भारताचं नाव मोठं करण्यात वैष्णव यांनी बजावलेली महत्वाची भूमिका अधोरेखित झाली आहे, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहे. गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई, ओपन एआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नडेला, मेटाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमन, मार्क झुकेरबर्ग आणि इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलेकणी यांचाही या यादीत समावेश आहे.

**<><><><><>**

अमेरिकी खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत बेलारूसच्या अरीना सबालेंका हिनं अजिंक्यपद पटकावलं आहे. आज झालेल्या अंतिम सामन्यात तिनं अमेरिकेच्या जेसिका पेगुला हिच्यावर ७-५, ७-५ अशी सरळ सेट्समध्ये मात केली आणि कारकीर्दीतलं तिसरं ग्रॅन्डस्लॅम अजिंक्यपद पटकावलं.

तत्पूर्वी पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या मॅक्स पर्सेल आणि जॉर्डन थॉम्प्सन या जोडीनं जर्मनीच्या जोडीचा सरळ सेट्समध्ये पराभव केला. पुरुष एकेरीत आज अमेरिकेचा टेलर फ्रित्झ याच्यासमोर अग्रमानांकित इटलीच्या यानिक सिनरचं आव्हान असेल.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेचा समारोप सोहळा आज रात्री होणार आहे. या कार्यक्रमात भारताचा ध्वज, स्पर्धेतला सुवर्णपदकविजेता तिरंदाज हरविंदर सिंह आणि धावपटू प्रीती पाल यांच्या खांद्यावर असेल. या स्पर्धेत एकंदर २९ पदकांची कमाई करून भारतानं पदकतालिकेत अठरावं स्थान पटकावलं आहे. ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि १३ कास्यपदकांसह भारतानं स्पर्धेच्या इतिहासातल्या आपल्या सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली आहे. स्पर्धेतल्या शेवटच्या, महिलांच्या कायाक एकेरी प्रकारात भारताच्या पूजा ओझा हिला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २९ सप्टेंबरला आकाशवाणीवर मन की बात कार्यक्रमातून देशवासियांसोबत संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी येत्या २७ तारखेपर्यंत आपल्या सूचना पाठवता येतील.

या सूचना १८०० - ११ - ७८०० हा टोल फ्री क्रमांक, १९२२ या क्रमांकवर मिस्ड कॉल देऊन येणारा दुवा, तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा माय जी ओ व्ही या सेवेचा वापर करून पाठवता येणार आहेत.

हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, संकेतस्थळं, आणि मोबाईल ॲपवर प्रसारित होईल.

**<><><><><>**

महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या वतीनं आयोजित ७व्या राष्ट्रीय पोषण महिन्याअंतर्गत सातव्या दिवसापर्यंत देशभरात १ कोटी ७९ लाखापेक्षा जास्त उपक्रम राबवले गेल्याची माहिती मंत्रालयानं दिली आहे. यात नवजात बालकांसाठीच्या पूरक आहाराशी संबंधित २० लाखापेक्षा जास्त उपक्रमांचा समावेश होता असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. यंदाच्या या सातव्या राष्ट्रीय पोषण महिन्याला देशभरातून उत्तम प्रतिसाद मिळत असून, ३५ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ७५६ जिल्ह्यांनी जनजागृती मोहिमा, तसंच पोषण विषयक जागृतीपर उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवला असल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या पश्चिम, पूर्व आणि दक्षिण भागात जोरदार ते अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा भारतीय हवामानशास्त्र विभागानं दिला आहे. आंध्र प्रदेशाचा किनारी भाग आणि यानम इथे आज अत्यंत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओदिशा इथे उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**